## कलम-11 अधिसूचना

### भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013

क्र.2020/उपजिअ/भूसं/पात/लसिंका क्र.2/मौ.करखेली/सीआर-05 दि.02/12/2020

ज्याअर्थी, भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013 (2013 चा 30) याच्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण 11/2014 प्र.क्र.77/अ-2, दिनांक 19 जानेवारी,2015 (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा कारण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम (3) च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील 500 हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यक्ता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम-11 च्या पोट कलम (1) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यात भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेली आहे. आणि ज्याअर्थी, कलम 43 च्या पोट कलम (1) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये

दिलेला आहे; त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम 4 नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतू, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्कर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोट कलम (5) अनुसार, जिल्हाधिकारी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम-2014(यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम 10 च्या उपनियम (3) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करण्यात असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) पातलसिंका क्र.2 नांदेड** यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

गावः मौ. करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड

| अ.क्र. | भूमापन क्र. किंवा गट क्र. | संपादीत क्षेत्र हे.आर मध्ये |
|---|---|---|
| 01 | 407 | 0.25 |
| 02 | 421 | 0.07 |
| एकूण | | 00 हे. 32 आर |

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांवः**-भूसंपादन प्रस्ताव ईसापूर उजवा कालवा/पांरगी वितरीका सा.क्र.137680 मी. वरील पांगरी वितरीकाचे काम (सा.क्र.0 ते 3995) (अतिरिक्त प्रस्ताव) लांबीतील कामासाठी **मौ.करखेली** ता. धर्माबाद जि. नांदेड.

**प्रकल्प कार्यालयाचे वर्णनः**- कार्यकारी अभियंता, **उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग** क्र.8 नांदेड.

**समाजाला मिळणारे लाभः**-जलसिंचन सुविधा.

अनुसूची तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची चार

भूसंपादन जनतेच्या पायाभूत सुविधासाठी होत असल्याने सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाचा अभिप्राय आवश्यक नाही.

अनुसूची पाच

प्रशासकाची नियुक्ती करणे आवश्यक नाही.

**टिपः**- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) पातलसिंका क्र.2, जि.अ.का. नांदेड येथे निरिक्षण करता येईल.

दिनांकः-02/12/2020

ठिकाणः नांदेड

(डॉ. सचिन खल्लाळ)

उपजिल्हाधिकारी भूसंपादन

पातलसिंका क्र.2 नांदेड